# A REPORT

## ON

# “ शिवस्वराज्य दिन ”

**( 6 June 2021)**

**Shri.Yashwant Shiksha Prasarak Mandal’s**

# Vasantidevi Patil Institute of Pharmacy

**Kodoli, Tal. Panhala, Dist. Kolhapur-416 114 (MH)**

**Phone:** (02328) 223341 ,**Fax:** (02328) 222089;

**Website:**www.vpipkodoli.com; **Email:**vpip@yspm.in



**ABOUT SHREE YASHWANT SHIKSHAN PRASARAK MANDAL:**

Shri Yashwant Shikshan Prasarak Mandal (YSPM), Kodoli, is a premier group of Institutions established by great visionary and compassionate **Ex. MLA. Hon. Late.Shri Yashwant Eknath Patil (Dada) in the year 1982** with a broad objective of socio-economic development and ethical transformation with lending a helping hand towards the welfare of the society.

**ABOUT INSTITUTE:**

Vasantidevi Patil Institute of Pharmacy (VPIP), Kodoli was established in 2003 under aegis of **Shri Yashwant Shikshan Prasarak Mandal, Kodoli.** VPIP is a progressive edifying organization, dedicated to the pursuit of excellence help and widen our nation's technological and health base by providing high quality education through a creative balance of academic, professional, extension and extracurricular programmes. VPIP provides facilities to caters, quality technical and health education in rural and urban society, by making education accessible to the deprived and deserving

**VISION**

To become a premier, recognized institute by excelling in pharmacy education for creating the dynamic, competent, valued, socially responsible and knowledgeable Professionals, who shall contribute in the nation building process and enrich their lives.

**MISSION**

To achieve Excellency in Pharmacy pedagogy and research, through student centric quality education, state-of-art research facility and holistic growth of students, to develop skilled pharmacy professional for strengthening the healthcare of the nation.

**QUALITY POLICY**

- The VasantideviPatil Institute of Pharmacy, Kodoli strides towards excellence, by adopting a system of qualitative policies and processes with continued improvements to enhance students' skills and talents for their exemplary contribution to the society, the nation and the world.
- Institute ensures that its students get stat-of-the-art technical and healthcare professional education as per the rules and regulations of the all education regulatory apex bodies.
- The institute strives hard towards shaping the career of its students in the right perspective through a competent and research oriented teaching faculty; through a continuous industry-academia interaction; and by fostering the holistic development of the students as well as the staff.
- The institute blend the traditional values with modern technology and devote ourselves to the relentless pursuit of excellence in professional education and development of better human being.

## STEERING COMMITTEE



### Chief Patron
**Hon. Dr. Jayant Patil**
Chairman,
Shri Yashwant Shikshan Prasarak Mandal,
KODOLI



### Patron
**Hon. Mrs. Vinita Patil**
Trustee,
Shri Yashwant Shikshan Prasarak Mandal,
KODOLI



### Dr. S. A. Payghan
**Principal,**
Vasantidevi Patil Institute of Pharmacy, Kodoli



**Cordinator**
**Mr. U.V.Patil**
Vasantidevi Patil Institute of Pharmacy, Kodoli



**Cordinator**
**Ms. R.A. Mujawar**
Vasantidevi Patil Institute of Pharmacy, Kodoli



**Cordinator**
**Ms. K.A. Nangare**
Vasantidevi Patil Institute of Pharmacy, Kodoli

CONTENT:

- INTRODUCTION
- SCHEDULE
- EVENT DETAILS
- ACKNOWLEDGMENT
- EVENT PHOTOGRAPHS

## About Program:


**<u>Vasantidevi Patil Institute Of Pharmacy, Kodoli</u>** celebrate A "Shivswrajya din" at college . we organize competitions for D Pharm and B pharm Student. Essay writing is a very sensitive form of self expression. It is a blending of 'thought' and 'expression'.. Keeping this perspective in mind our college organize this competition on 6 June 2021

## " शिवस्वराज्य दिन "

## Schedule

| Sr. No | Day / Date | Activity | Sub activity | Resources | Physical /virtual |
|---|---|---|---|---|---|
| 1.<br>2. | Sunday 06/06/21 | SHIVSWARAJYA DIN | Photopujin<br>Essay competition<br>Speech competition | By-<br>Mr. Umesh patil<br>Miss. Ruksana Mujawar | Vasantidevi patil institute of pharmcy, kodoli<br>Zoom Meeting |

**6 June 2021**




The motive of the programme was to understand Chhatrapati Shivaji Maharaj as a great king and leader and to pay tribute to his great works. The programme began with photopujan of Chatrapati shivaji maharaj

The Photopujan program are present Academic inccharge(Diploma &Degree)Teching Staff,Non-Teching Staff

Principal Dr. santosh payghan addressed the Student and Prof. Miss. Ruksana Mujawar anchored the programme. The programme was conducted through Zoom meeting in which around 60 student join the meeting with all teachers .

Prof .Umesh Patil, Prof. Kavita Nangre Prof. Ruksana Mujawar worked for the successful organization of the online programme. It was organized under the guidance of Principal- Dr. Santosh Payghan .

- Date- 06/06/21
- Time- 11.00 Am to 12.00 Pm
- Venue - Vasantidevi patil institute of pharmacy, Kodoli.



**Photopujan Of Chatrapati Shivaji Maharaj at Vasantidevi Patil Isntitute Of Pharmacy, Kodoli**


VASANTIDEVI PATIL
INSTITUTE OF PHARMACY, KODOLI


VASANTIDEVI PATIL

- Date- 06/06/21
- Time- 12.00 Pm to 2.00 Pm
- Venue -Zoom meeting

**वासंतीदेवी पाटील इन्स्टिट्यूट ऑफ फार्मसी कोडोली मार्फत ,** "शिवस्वराज्य दिन" दि. ६ जून २०२१ रोजी साजरा केला जात आहे. याचेच औचित्य साधून महाविद्यालया अंतर्गत "वक्तृत्व स्पर्धा" आणि "निबंध स्पर्धा" दिनांक ६ जून २०२१ रोजी सकाळी १२ ते २ पर्यंत या वेळेत आयोजित केली आहे. तरी सर्व विद्यार्थ्यांनी आपला सहभाग नोंदवावा.

**वक्तृत्व स्पर्धेचे विषय:-**
१ . रयतेचा राजा शिवछत्रपती
२ . छत्रपती शिवाजी महाराजांचे शेती विषयक धोरण
३ . शिवराज्याभिषेक सोहळा

**निबंध स्पर्धेचे विषय :-**
१ . दुर्लक्षित गडकिल्ले

□ **लिंक पुढील प्रमाणे :-**
**https://us04web.zoom.us/j/74886386288?pwd=QzVOM2srcGxSWGcvMFZGUmtHdmdkdz09**

**Meeting ID: 748 8638 6288**
**Passcode: m17QV1**

**अधिक माहितीसाठी संपर्क-** Miss.Ruksana Mujawar Mr.Umesh Patil
Contact number-
93739 70288
99758 70954

**प्राचार्य**
**वासंतीदेवी पाटील इन्स्टिट्यूट ऑफ फार्मसी कोडोली.**

- **Topic: "शिवस्वराज्य दिन" निमित्त वक्तृत्व आणि निबंध स्पर्धा**
- **आयोजक- वासंतीदेवी पाटील इन्स्टिट्यूट ऑफ फार्मसी कोडोली.**
- **Time: Jun 6, 2021 12:00 PM Mumbai, Kolkata, New Delhi**
- **Join Zoom Meeting**

**https://us04web.zoom.us/j/74886386288?pwd=QzVOM2srcGxSWGcvMFZGUmtHdmdkdz09**

- **Meeting ID: 748 8638 6288**
- **Passcode: m17QV1**

## List of Participants

" Essay competition "

| Sr.no | Name of student | Class |
|---|---|---|
| 1 | Shweta patil | D- pharm 1st year |
| 2 | Raviraj Mohite | B- Pharm 1st year |

# दुर्लक्षित गडकिल्ले

## १> दौलतमंगळ :

किल्ल्याची उंची : 2000
किल्ल्याचा प्रकार : गिरीदुर्ग
जिल्हा : पुणे
श्रेणी : सोपी

पुणे : सोलापुर मार्गावरील यवत गावाजवळ असणारा दौलतमंगळ किल्ला आज नामशेष होण्याच्या मार्गावर आहे. सध्याच्या काळात दौलत-मंगळ किल्ला फारसा प्रसिद्ध नाही. पण त्या टेकडीवर असलेले हेमाडपंथी भुलेश्वर मंदिर मात्र प्रसिद्ध आहे. १२ व्या शतकात बांधलेल्या भुलेश्वर मंदिराचे बांधकाम काळ्या बेसाल्ट खडकात केलेले आहे. हे मंदिर असलेल्या टेकडी भोवती तटबंदी, बुरूज बांधून शहाजीराजांच्या काळात दौलतमंगळ किल्ल्याची उभारणी करण्यात आली. किल्ल्याच्या दक्षिणेस असलेल्या मंगळाई देवीच्या ठाण्यावरून या किल्ल्याला "दौलतमंगळ गड" हे नाव पडले.

पौराणिक आख्यायीके नुसार पार्वतीने महादेवांना प्रसन्न करण्या-साठी येथेच नृत्य केले होते. येथेच त्यांचा विवाह येथुनच ते कैलास पर्वतावर गेले होते. त्याठिकाणी भुलेश्वर मंदिराची उभारणी यादवांनी केली. १६ व्या शतकात शहाजीराजांचे सासरे लखुजी जाधव आणि त्यांच्या तीन पुत्रांची निजामाने भर हत्या केल्यावर शहाजीराजांनी निजामशाही सोडण्याचा निर्णय घेतला. त्यावेळी इतर कुठल्या बादशाहाच्या पदरी राहाण्यापेक्षा स्वंतत्र राज्य स्थापण्याची शपथ घेतली. पुणे ही शहाजी राजांना वडिलोपार्जित मिळालेली जहागिरदारी होती. आदिलशहाच्या ताब्यात असलेल्या पुण्यावर शहाजीराजांनी स्वारी केली आणि पुणे व आजुबाजूचा प्रदेश ताब्यात घेतला. शहाजीराजांच्या हल्ल्यामुळे चिडलेल्या आदिलशहाने रायराव नावाच्या सरदाराला मोठी फौज देऊन पुण्यावर पाठवले. युद्धाच्या या धामधुमित गरोदर असलेल्या जिजाबाईंना शहाजी राजांनी सुरक्षित अशा शिवनेरी किल्ल्यावर पाठवले. रायरावने पुण्यावर हल्ला करून पुणे उध्वस्त केले. त्यावरून गाढवाचा नांगर फिरवला.

पहाण्याची ठिकाणे :

पुणे सोलापूर महामार्गावरील यवत गावापासून १० किलोमीटर अंतरावर दौलतमंगळ गड आहे. डांबरी घाट रस्ता थेट किल्ल्यावर जातो

**Rank-1 Essay- Shweta patil**

त्यामुळे चुकण्याची अजिबात शक्यता नाही. मंगळगडाच्या विस्तार पूर्व पश्चिम असून उत्तरेकडील प्रवेशद्वारातून किल्ल्यात प्रवेश होतो. किल्ल्यावर जात असताना वाटेत प्रवेशद्वाराच्या आधी २ बुरूज पाहायला मिळतात. तर पश्चिमेला एक बुरूज पाहायला मिळतो. काळौघात किल्ल्याची तटबंदी आणि इतर अवशेष नामशेष झाले आहेत. प्रवेशद्वाराच्या अलिकडे एक पायवाट असून तेथून १५ मिनिटे चालत गेल्यास थेट भुलेश्वर मंदिरात प्रवेश होतो. पायवाटेच्या उजव्या बाजू-ला एक पडझड झालेली एक कमान आढळते. वाहनाने गेल्यास वाहने मंदिराच्या मागच्या बाजूला पार्क करून ५ मिनिटे चालत गेल्यावर मंदिरात प्रवेश होतो. संपूर्ण गडाचा फेरफटका मारण्यास एक तास लागतो. आजूबाजूला असलेल्या विस्तृत पठाराचे दर्शन होते.

## २) भूषणगड :

### भौगोलिक स्थान :

सातारा जिल्ह्यातील माण तसेच खटाव तालुक्यातील गाव वडूज आहे. वडूज हे गाव सातारा, कऱ्हाड, फलटण, दहिवड यांच्याशी गाडीमार्गाने जोडलेले आहेत.

### जाण्यासाठी मार्ग :

वडूजच्या दक्षिणेकडे साधारण पंचविस, तीस कि.मी. वर भूषणगड हा किल्ला आहे. भूषणगडाचा डोंगर एकांड्या असल्यामुळे खूप दुरूनही ओळखून येतो. वडूजमधून भूषणगडाला जाण्यासाठी ठरावीक एस.टी. बसेस आहेत. वडूज-पुसेसावळी गाडीरस्त्यावर पळशी गाव आहे. येथून चालतही भूषणगडला जाता येते. हे अंतर पाच किलोमीटर असून हा रस्ता कच्चा आहे.

भूषणगड किल्ल्याच्या पायथ्याशीच भूषणगड नावाचे छोटेसे गाव आहे. या गावात येण्यासाठी चारही बाजूने रस्ते आहेत. गडाची गडदेवता 'हरणाईमाता' ही अनेकांच्या श्रद्धास्थानी आहे. भूषणगड गावातून किल्ल्याकडे निघाल्यावर आपल्या स्वागताला एक कमान उभी केलेली आहे. येथूनच गडावर जाणाऱ्या पायऱ्यांचा मार्ग नव्यानेच बांधून काढला आहे. भक्तांच्या अर्थसहाय्यातून हा मार्ग व गडाची देवता हरणाई मातेचे मंदिर नव्याने बांधले गेले आहे. समुद्रसपाटीपासून १०४ मीटर उंच असलेला भूषणगड चढण्यासाठी पायथ्यापासून २० मिनिटे लागतात. दरवाजाच्या २५ फूट खाली एक वाट तटबंदीच्या खालून उजवीकडे जाते. गडाच्या पश्चिम बाजूला वळसा मारून ती मागच्या बाजूच्या मंदिरापर्यंत जाते. तेथे घुमटीवजा मंदिर आहे. घुमटीमध्ये देवीची मूर्ती असून तिचे नाव भुयारी देवी आहे. येथून पुन्हा फिरून दरवाजाकडे यावे लागते दाराजवळ 'म्हसोबा' मंदिर आहे.

प्रतिपच्चंद्रलेखेव वर्धिष्णुर्विश्ववंदिता शाहसुनोः शिवस्यैषा मुद्रा भद्राय राजते

येथून दरवाजाची बांधणी दिसते. पायऱ्यांच्या बाजूला संरक्षक भिंत बांधून दरवाजाची सुरक्षितता वाढवली आहे. पायऱ्यांच्यावर दोन्ही बाजूंना बुरूज आहेत. वळणदार मार्गावरच्या या दरवाज्यावर खालून तोफमारा करणे शक्य होते. दरवाजाची कमान पडलेली आहे. येथून पुढे गेल्यावर सरळ वाट पश्चिम कड्यावर जाते. तर डावीकडील वाट माथ्याकडे जाते. भूषणगडाचा एकूणच विस्तार लहान आहे. माथा चारही अंगाने तटबंदीने सुरक्षित केलेला असून गडावर सुशोभिकरणासाठी लावलेल्या झुडपांनी आता तटबंदी व घरांची जोती आच्छादित झाली आहेत. भूषणगडाचा आकार साधारणे त्रिकोणी आहे. या तिन्ही टोकावर टेहाळणीसाठी बुरूज आहेत. या तिन्ही टोकांच्या मध्यभागी उंचवटा असून त्यावर मंदिर आहे. मंदिराच्या बाजूला धर्मशाळा असून तेथे मुक्कामाची सोय होऊ शकते. गडाला लागून एकही डोंगर नाही त्यामुळे गडावरून चारही बाजूला दूरपर्यंत शत्रूवर नजर ठेवता येते.

आदिलशाही कडून हा किल्ला शिवशाहीत दाखल झाला व पुढे औरंगजेबाच्या ताब्यात हा किल्ला होता. पुढे मराठेशाही मध्ये हा किल्ला त्यांच्या ताब्यामध्ये गेला.

इतिहासाच्या पानावर<br>
रयते च्या मनावर<br>
मातीच्या कणावर आणि<br>
विश्वासाच्या प्रमाणावर<br>
राज्य करणारा राजा म्हणजे<br>
राजा शिवछत्रपती<br>
मानाचा मुजरा.

# दुर्लक्षीत गड-किल्ले

GoodLuck | Page No. | Date

देशातल्या सधन अशा राज्यांमध्ये महाराष्ट्राची गणना होते. मात्र, महाराष्ट्र राज्य हे फक्त पैशांनीच सधन नसून, ऐतिहासिक वारशानेही तितकेच सधन आहे. राज्यातील गड-किल्ले ही महाराष्ट्राची खरी ओळख आणि संपत्ती आहे. आकडेवारी काढली तर महाराष्ट्र राज्य हे देशातील सगळ्यात जास्त गड-किल्ले असणारे राज्य म्हणावे लागेल. पाणदुर्ग, डोंगरी गढ्या आणि ह्याचबरोबर डोंगरी किल्ले मिळून महाराष्ट्रातील एकूण गड-किल्ल्यांची संख्या सातशेच्या घरात जाते आणि याचे श्रेय जाते ते स्वराज्याची स्थापना करणाऱ्या छत्रपती शिवरायांना ! चला तर आता वळूया महाराष्ट्रातील एका किल्ल्याकडे आणि तो म्हणजे आपला 'रायगड'.

'रायगड' म्हणजे मराठी मनाचा मानबिंदू !. या रायगडाच्या भेटीसाठी माझे मन लक्षणीय आतुर झाले होते, अरे काय योगायोग पहा ! उन्हाळ्याच्या सुट्टीत मी आणि माझ्या मित्रांनी नेमके फिरायला रायगडावर जाण्याचे निश्चित केले. आम्ही रायगडावर पोहोचलो तोच माझ्या कानावर धीर-गंभीर शब्द आदळले "अरे मित्रा थांब, थांब!" एवढ्या आतुरतेने मला भेटण्यासाठी आला, मी तुझे स्वागत केले. प्रत्यक्ष रायगड माझ्याशी बोलत असल्याचे मला जाणवले रायगडाचे अर्थ निवेदन माझ्या कानी पडत होते.

अरे दोस्ता, तुझ्यासारखी माझ्यावर नितांत प्रेम करणारी मंडळी फारच थोडी. बहुतेक माणसे सहलीच्या निमित्ताने येतात आणि धुमाकूळ घालतात. त्यामुळे या ऐतिहासिक वास्तूत येऊनही त्यांचे माझ्याकडे लक्षच नसते. मित्रा, मी माझ्या या जीर्ण थकलेल्या मनात एवढ्या आठवणी करून ठेवल्या आहेत म्हणून सांगू ! ज्या पर्वतावर मी आज अनेक वर्षे उभा आहे, तो हा 'सह्याद्री' म्हणजे स्वातंत्र्याचा रखवालदार आहे. अनेक गड-किल्ले आजही याच्या भक्कम अंगाखांद्यावर दिमाखाने उभे आहेत. या महाराष्ट्र भूमीचे रक्षण करायचे हे त्याचे जीवन ध्येय आहे. आजवर अनेक आक्रमणांना त्याने आपल्या निधड्या छातीने थोपवून धरले. त्याच्या मजबूत खांद्यावर उभे राहून स्वातंत्र्यासाठी चाललेल्या संघर्षाच्या प्रत्येक क्षणांचे मी अवलोकन केले आहे आणि रोमांचित झालो आहे.

"आहे उभा मी आज भक्कम याठात,
निधड्या छातीच्या सह्याद्रीच्या कुशीत."

**Rank-2 Essay- Raviraj Mohite**

GoodLuck | Page No. | Date

हिंदवी स्वराज्य स्थापन झाल्यावर छत्रपती शिवरायांनी राजधानी म्हणून जेव्हा माझी निवड केली, मला माझ्या जीवनाचे सार्थक झाल्यासारखे वाटले. आता आपल्या शूर वीर राजांचा सहवास आपल्याला लाभणार या कल्पनेने मी हर्षभरित झालो. पण त्या महात्म्याला फारशी उसंतच मिळाली नाही. तो महापुरुष अनेकविध कामात गुंतलेला असायचा.

"महाराज गेले आणि सारी रयाच गेली माझी!" लढाईच्या वेळेच्या तोफांचे भय मला कधीच वाटले नव्हते, पण घरभेदी माणसाची कटकारस्थाने माझे मन विदीर्ण करत असे हे स्वकीय. महाराजांचा कार्यकाळ झाल्यानंतर आनेल समाजकंटक जागोजागी माझ्या अंगावर खनत, त्यांना वाटे महाराजांचे त्यावेळचे धन मिळेल. पण, त्यावेळी त्यांना हे कळलं नाही की खरे धन महाराजांनी महाराष्ट्रात घरोघर वाटले; ते अक्षय धन होते ज्वलंत राष्ट्रभक्तीचे, कधीच न संपणारे.

याची समज आणि उमज फारच थोड्यांना समजली. शिवरामपंत परांजपे यांच्या दृष्टीस राष्ट्रभक्तीचे धन पडले आणि त्यांच्या तेजाने ते दिपून गेले. गो. नी. दांडेकर यांनी ते भावले, ब. मो. पुरंदरे त्या धनसंपत्तीने तृप्त झाले. आपल्या बंगल्यानवर, राजांना माझे नाव देऊन काय होणार? त्यासाठी हवी ती थोर राजासारखी प्रकार देशनिष्ठा, पण आजकाल त्यांचा अभाव आहे आणि हीच माझी व्यथा आहे, खंत आहे.

रायगडाचे हे मनोगत ऐकत महाराजांच्या समाधीसमोर आलो, तोच रायगडाचा धीरगंभीर आवाज बंद झाला. आसवांच्या फुलांची ओंजळ महाराजांच्या संगतीला वाहून मी त्या थोर महात्म्याच्या समाधीला वंदन केले आणि परतीची वाट धरली. पण अजूनही रायगडाचा तो धीरगंभीर आवाज कानातून जात नाही. आता खरी गरज आहे ती दुर्लक्षीत गड-किल्ल्यांकडे लक्ष देण्याची.

किल्ल्यांचे संवर्धन हा सरकारच्या अखत्यारीत येणारा भाग. त्यामुळे अनेक नियम आणि निधी यांची सांगड घालत संवर्धनाचे काम केले जाते. परिणामी भक्कम अशी पावले आजही उचललेली दिसत नाहीत. किल्ले संवर्धन या विषयावर सरकारी दालनात समितीची स्थापना करण्यात आली आहे. सरकारी स्तरावर योजना आखणीही केली जाते. मात्र, या योजनांची अंमलबजावणी कासवगतीने होत आहे.

GoodLuck Page No.
Date

छत्रपती शिवरायांनी काळाची गरज ओळखून सह्याद्रीच्या रांगांमधून गड-किल्ले बांधले. सह्याद्रीच्या कुशीत बसलेले हे गडकिल्ले काही चमत्कारापेक्षा वेगळे नाहीत. त्याकाळी उपलब्ध असलेल्या तंत्रज्ञानाचा वापर करून अभेद्य अशा गड-किल्ल्यांची उभारणी करण्यात आली आणि याच गडकिल्ल्यांचा आधार घेत महाराजांनी हिंदवी स्वराज्याची स्थापना केली.

शिवकालीन गडकिल्ले महाराष्ट्राचा ऐतिहासिक ठेवा. प्रत्येक किल्ल्याचे आपले असे भौगोलिक महत्त्व आहे. प्रत्येक किल्ल्याचा वेगळा इतिहास आहे. मात्र आज या देदीप्यमान अशा इतिहासाचा अनेकांना विसर पडत चालला आहे. महाराजांच्या गडकिल्ल्यांचे महत्त्व आज केवळ इतिहासाच्या पुस्तकांमधूनच अनुभवता येत आहे. प्रत्यक्षात मात्र गडकिल्ल्यांच्या नशिबी अवहेलनाच आलेली दिसते. आज अनेक गड-किल्ले जीर्णावस्थेत आहेत, त्यांची पडझड झाली आहे.

आपल्या या ऐतिहासिक वारशाचे जतन करणे आणि त्याबाबत जनमानसात जागृती निर्माण करणे या विचाराने आज अनेक जण गड-किल्ले संवर्धन करण्यासाठी सज्ज झाले आहेत. मात्र, हा अपवाद वगळता बाकी स्तरावरून म्हणावे तसे प्रयत्न होताना दिसत नाहीत. अनेकदा सरकारी स्तरावर अशा गडांची दखलही घेतली जात नाही.

किल्ल्यांच्या झालेल्या दुर्लक्षिततेकडे आणि त्याच्या संवर्धनासाठी महाराष्ट्रात असणाऱ्या किल्ल्यांची गणना करणे आणि त्या दृष्टीने आवश्यक ती पावले उचलणे गरजेचे आहे. आपल्या या वारशाची पुढील पिढीला ओळख करून देण्यासाठी आज प्रबोधनाची गरज आहे. पर्यटनाच्या दृष्टीने किल्ल्यांवरच्या सोयी-सुविधांमध्ये सुधारणा करणे, ऐतिहासिक प्रसंगांना उजाळा देणे आणि इतर आणखी उपक्रम राबवून लोक प्रबोधन करण्यावर भर दिल्यास गडकिल्ले संवर्धनाला हातभार लागेल आणि त्यातून दुर्गप्रेमींनाही पाठबळच मिळणार आहे. महाराष्ट्राच्या ऐतिहासिक वारशाच्या या मूक संवर्धनानेच महाराष्ट्राचे उज्वल भविष्य घडेल.

"जय जिजाऊ जय शिवराय !"

नाव : रविराज रंगराव मोहिते.
B. Pharm, First Year Student


# List of Participants


" Speech competition "


| Sr.no | Name of student | Class |
|---|---|---|
| 1 | Anjali Mahadik | D- pharm 1st year |
| 2 | Pranav Patil | B- Pharm 1st year |
| 3 | Mrunal Gharge | D- pharm 1st year |
| 4 | Aasha Yadav | B- Pharm 1st year |
| 5 | Priyanka khot | B- Pharm last year |
| 6 | Shradha holmukhe | B- Pharm 3rd year |
| 7 | Sagar Patil | D- pharm 2nd year |
| 8 | Suraj gije | D- pharm 1st year |

Winner-
1) Aasha yadav

Runner-
2)Sagar patil





32% 13:00
Close
Participants (33)
Prachi Patil
PY Pranav Yadav
PM Pratiksha Mahesh Jadhav
RM Raviraj mohite 30
SD Saurav Deshmukh
SM SHIVRAJ MANE
shraddha holmukhe(14)
SURAJ GIJE
TP Tejaswini patil
VK Vijay Kamble
Invite


32% 12:38
Rutika
...MRUNAL GHARGE...
Ruksana Mujawar
Gitanjali Gundanake


33% 12:29
Zoom
Leave
REC
Unmute
Start Video
Share
Participants
More


32% 12:56
REC
shraddha holmukhe(14)

## News of event-

3:30 PM

# वासंतीदेवी पाटील फार्मसीत शिव स्वराज्य दिन सोहळा उत्साहात साजरा

Sunil Rajput   1 week ago   खबर कट्टा
Leave a comment   75 Views

**कोडोली / कोल्हापूर** : श्री यशवंत शिक्षण प्रसारक मंडळ संचलित वासंतीदेवी पाटील इन्स्टिट्यूट ऑफ फार्मसी कोडोली या महाविद्यालयामध्ये शिवराज्याभिषेक सोहळा उत्साहात साजरा करण्यात आला. शिवस्वराज्य सोहळा हा मराठा साम्राज्याची मुहूर्तमेढ रोवणारा अत्यंत महत्त्वाचा दिवस म्हणून ओळखला जातो. छत्रपती शिवाजी महाराज हे केवळ महाराष्ट्राचे नव्हे तर संपूर्ण भारत वर्षाचे प्रेरणास्थान आहेत. त्यांनी महाराष्ट्रामध्ये स्वराज्य स्थापन केले . हे रयतेचे राज्य चिरंतन रहावे म्हणून या दिवशी रायगडावर छत्रपती शिवाजी महाराजांचा राज्याभिषेक करण्यात येतो याचेच औचित्य साधून महाविद्यालयांमध्ये छत्रपतींच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. तसेच महाविद्यालयांमध्ये वकृत्व व निबंध स्पर्धा ऑनलाइन पद्धतीने आयोजित करण्यात आल्या .

WhatsApp us

3:30 PM



वकृत्व स्पर्धेसाठी रयतेचा राजा शिवछत्रपती, छत्रपती शिवाजी महाराजांचे शेतीविषयक धोरण व शिवराज्याभिषेक सोहळा तसेच निबंध स्पर्धेसाठी दुर्लक्षित गड किल्ले इत्यादी विषयावर घेण्यात आल्या. या स्पर्धेला महाविद्यालयांमधून विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला .यामध्ये वकृत्व स्पर्धेत आशा यादव प्रथम वर्ष बी फार्मसी, सागर पाटील द्वितीय वर्ष डी फार्मसी आणि निबंध स्पर्धेत श्वेता पाटील प्रथम वर्ष डी फार्मसी, रविराज मोहिते प्रथम वर्ष बी फार्मसी मधील विद्यार्थी विजेते ठरले. या संपूर्ण सोहळा उत्साहात पार पाडण्यासाठी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. संतोष पायघन यांचे मोलाचे मार्गदर्शन लाभले व संस्थेचे सचिव मा. डॉ. जयंत पाटील आणि विश्वस्त मा. विनिता पाटील यांचे सहकार्य लाभले.तसेच या सोहळ्याचे व स्पर्धेचे नियोजन प्रा. उमेश पाटील व प्रा. रुकसाना मुजावर यांनी केले. यावेळेस महाविद्यालयातील इतर विद्यार्थी,शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते.

Share on:

WhatsApp

WhatsApp us


Thank
you